# रे.दि.मु.नं. २२०/२०११ नि.०५ खालील आदेश :—

१) वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त ताकीदीकरीता दाखल केला आहे.

२) वादींचे कथन थोडक्यात असे की, मौजे राजाळे तालुका फलटण येथील शेतजमिन गट नं. ४२३/१ एकुण क्षेत्र ३ हे. ७ आर ही मिळकत वादींचे वडिल कृष्णा तात्या ठेंगील यांनी वादी, प्रतिवादी क्र. ५ व त्यांची बहिण तांनूबाई यांना दि.२७/१०/१९८७ चे बक्षिसपत्रा अन्वये दिलेली आहे. तेव्हापासून, वादी दावा मिळकत मालकी हक्काने वहिवाटतात. असे असतांना प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी फेरफार क्र. ३५९५ अन्वये सदर मिळकतीस त्यांचे व वादींची आई चिमाबाई अश्यांच्या नावाची नोंद करुन घेतली. तसेच, चिमाबाई यांचे निधन झालेनंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे व वादी क्र. १ ते ३ यांच्या नावाच्या नोंदी करुन घेतल्या. वादींचे म्हणणेनुसार सदर नोंदी या बेकायदेशीर असून त्या अन्वये प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना गट नं. ४२३/१ बाबत कुठलेही अधिकार पोचत नाहीत. असे असतांना देखील प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादींचे सदर मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळे करुन त्यांना सदर मिळकतींमधून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून, वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादींचे गट नं. ४२३/१ वरील कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळे करु नये व त्यांना सदर मिळकतीमधून हुसकावून लावू नये अश्या तुर्तातुर्त ताकीद करीता दिला आहे.

३) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.३८ कडे त्यांची लेखी कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे सादर केले. गट नं. ४२३/१ या मिळकतीवर वादींची कब्जेवहिवाट असल्याचे सदर प्रतिवादी यांनी नाकारले आहे. सदर प्रतिवादींचा विवाद असा की, सदरचे बक्षिसपत्र हे केवळ कागदोपत्री तयार केलेले असून, त्याचा अंमल झालेला नाही. त्यामुळे, फेरफार क्र. १०७ अन्वये झालेली वादींचे नावची नोंद पोकळीस्त आहे. सदर प्रतिवादींचे म्हणणेनुसार अनुकुलतेचा कल वादीचे लाभात नाही. म्हणून, वादीचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

४) वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे माझे विचाराधिन उपस्थित होतात व त्यावर मी माझा निष्कर्ष खालील कारणांसह नोंदवित आहे.

| | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीस सकृतदर्शनी केस आहे काय? | नकारार्थी |
| २) | अनुकुलतेचा कल वादीचे लाभात आहे काय? | नकारार्थी |
| ३) | वादीचे लाभात तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल काय? | नकारार्थी |
| ४) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

५) वादी यांनी त्याच्या केसचे पुष्ठयर्थ काही कागदपत्र सादर केले. ते म्हणजे, १. मौजे राजाळे, ता.फलटण येथील गट नं. ४२३/१, ४२३/२, ४२३/३, ४२३/४ व ८८३ चे २०१०—२०११ चे ७/१२ चे उतारे (नि.७ ते नि.११), २. मौजे राजाळे येथील फेर. नं. ६९६ व ३५९५ चे उतारे (नि.१२ व १३), ३. मौजे राजाळे येथील फेर. नं. १००७ व ४६७३ चे उतारे (नि.३(१) व ३(२), ४. बक्षिसपत्राची छायांकित प्रत (नि.३(३), ५. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना वकिलांमार्फत पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत (नि. ३(४),

६) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विवादाचे पुष्ठयर्थ साक्षीदार सोनाबाई काशीनाथ चोपडे, महादेव विठ्ठल भांडवलकर व बायडाबाई माणिक गाढवे यांचे शपथपत्र दाखल केले. (नि.५५ ते ५७). तसेच नि. ५८ सोबत गट नं. ४२५/३, ४२५/४, व गट निं. ४०२ चे सन २०१०—११ चे उतारे दाखल केले.

**मुद्दा क्र. १ ते ३ :—**

७) वादी व प्रतिवादी यांचे विद्वान वकिलांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

८) वादी यांचे प्रकथनानुसार गट नं. ४२३/१ ही मिळकत

त्यांचे वडिलांनी त्यांना बक्षिसपत्रा अन्वये दिलेली असून, तेव्हापासून सदर मिळकतीवर त्यांची कब्जेवहिवाट आहे. याउलट, सदर मिळकतीवर वादींची कब्जेवहिवाट असल्याचे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी स्पष्टपणे नाकारले आहे. प्रतिवादींचे विवादानुसार सदरचे बक्षिसपत्र हे कागदोपत्री असून त्याचा कुठलाही अंमल झालेला नाही. प्रतिवादींचे म्हणणेनुसार गट नं. ४२३/१ ही मिळकत त्यांचे कब्जेवहिवाटीत आहे.

९) गट नं. ४२३/१ या मिळकतीवर वादींची कब्जेवहिवाट आहे किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे. फेरफार क्र. ६९६ चे उता—याचे अवलोकन केले असता, गट नं. ४२३ ही जमिन कृष्णा तात्या ठेंगील व त्यांचे नातू म्हणजेच प्रतिवादी क्र. १ ते ३ अशी चौघांमध्ये विभागून त्यांचे हिस्स्याप्रमाणे नोंद झाल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे गट नं. ४२३/१ हया मिळकतीस कृष्णा तात्या ठेंगील यांच्या नावाची नोंद झाल्याचे दिसून येते. वादी यांनी नि.३ सोबत बक्षिसपत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतीचे या स्थितीला अवलोकन केले असता, गट नं. ४२३/१ एकूण क्षेत्र ३ हे. ७ आर ही मिळकत वादींचे वडिल कृष्णा तात्या ठेंगील यांनी वादी यांना बक्षिसपत्रा अन्वये दिल्याचे दिसते. फेरफार क्र. १००७ च्या उता—याचे अवलोकन केले असता, सदर बक्षिसपत्रा अन्वये गट नं. ४२३/१ या मिळकतीस वादी यांचे नावाची नोंद केल्याचे दिसून येते.

१०) फेरफार क्र. ३५९५ च्या उता—याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींचे वडिल कृष्णा ठेंगील यांनी त्यांचे नावावरील जमिन गट नं. ४२३/१ ही वादी, प्रतिवादी क्र. ५ व

त्यांची बहिण तांनूबाई यांचे नावे केली होती. परंतू, प्रत्यक्षात प्रतिवादी क्र. १ ते ३ हेच गट नं. ४२३/१ ही मिळकत वहिवाटीत होते व म्हणून वादी व त्यांचे इतर दोन बहिणी यांनी दिलेल्या आर्जावरुन व संमत्तीपत्रावरुन सदर मिळकतीस प्रतिवादी क्र. १ ते ३ व वादींची आई चिमाबाई यांचे नावाची नोंद अधिकार अभिलेखामध्ये झाल्याचे दिसून येते. म्हणजेच सदर नोंदीवरुन गट नं. ४२३/१ ही मिळकत पूर्वीपासून प्रतिवादी क्र. १ ते ३ हेच वहिवाटीत असल्याचे स्पष्ट होते. तसेच, सदर मिळकतीवर वादींची वहिवाट नसल्याचे देखील सदर नोंदीवरुन स्पष्टपणे दिसून येते. महसूल अधिकार अभिलेखांमधील नोंदीना पुराव्याचे दुष्टीकोनातून गृहीतकीय मूल्य आहे. जोपर्यंत अश्या गृहीतकाचे खंडण होत नाही तोपर्यंत सदरच्या नोंदी या ख—या आहे असे मानले जाते. वादींचे म्हणणेनुसार फेरफार नं.३५९५ ची नोंद बेकायदेशीर आहे. परंतु, ती कशी बेकायदेशीर आहे याबाबत वादी यांनी या स्थितीला दाखवून दिलेले नाही.

११) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि. ५५ कडे प्रतिवादी क्र. ५ सोनाबाई काशीनाथ चोपडे हिचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर सोनाबाई ही वादीची बहिण असून, बक्षिसपत्रांमध्ये तिचे देखील नाव आहे. सदर सोनाबाई तिचे शपथपत्रात सांगते की, सदर बक्षिसपत्र हे फक्त कागदोपत्री अस्तित्वात आणलेले आहे. तसेच, गट नं. ४२३/१ हया मिळकतीवर वादी व तिची कधीही प्रत्यक्ष कब्जेवहिवाट नव्हती व नाही असे देखील सोनाबाई तिचे शपथपत्रात स्पष्टपणे सांगते. अश्याप्रकारे, प्रतिवादी क्र. ५ सोनाबाई हिचे प्रतिज्ञापत्र देखील फेरफार क्र. ३५९५ चे नोंदीस पुष्टी आणते.

१२) वादींचे म्हणणेनुसार फेरफार नोंद क्र. ४६७३ ही प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी गैरफायदा घेण्याच्या हेतुने करुन घेतलेली आहे. सदर नोंदीचे अवलोकन केले असता, सदरची नोंद ही प्रतिवादी क्र. १ यांनी दिलेल्या अर्जावरुन घेतलेली वारस नोंद असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र. १ यांनी दिलेल्या अर्जा अन्वये केवळ प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेच नावाची वारस म्हणून नोंद झालेली नसून, वादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी क्र. ५ चे नावाची देखील चिमाबाई कृष्णा ठेंगील यांचे वारस म्हणून नोंद घेण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नोंद क्र. ४६७३ केवळ गैरफायदा घेण्याच्या उद्देश्याने करुन घेतली असती, तर त्यांनी केवळ त्यांच्याच नावाची नोंद करुन घेतली असती. परंतु, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी व प्रतिवादी क्र. ५ यांचे नावाची देखील वारस नोंद करुन घेतलेली आहे. अश्याप्रकारे, जर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना वादींचा हक्क डावलण्याचा असता, तर निश्चित प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी केवळ त्यांचेच नावाची नोंद करुन घेतली असती. वास्तविक उपरोक्त केलेल्या विवेचनानुसार गट नं. ४२३/१ या मिळकतीस वादी यांनी दिलेल्या अर्जावरुन व संमत्तीपत्रा अन्वयेच प्रतिवादी क्र. १ ते ३ व वादींची आई चिमाबाई यांचे नावाची फेरफार नोंद क्र. ३५९५ करण्यात आली आहे. तसेच, गट नं. ४२३/१ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ३ हेच वहिवाटीत असल्याने व तसा वादी यांनी अर्ज दिल्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे नावाची नोंद करण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येते. अश्याप्रकारे, नोंद क्र. ३५९५ ही विचारात घेतली असता, गट नं. ४२३/१ या मिळकतीवर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचीच कब्जेवहिवाट असल्याचे या स्थितीला दिसून येते. तसेच, नोंद क्र. ४६७३ ही विचारात घेतली असता, गट नं. ४२३/१ मधील वादींचे हितसंबंध डावलण्याचा प्रतिवादी क्र. १ ते

३ यांचा हेतू नसल्याचे दिसून येते. अश्याप्रकारे, उपरोक्त विवेचनाचे दृष्टीकोनातून मी या निष्कर्षाप्रत आलो की, वादी यांनी विनंती केलेप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकरीता त्यांना सकृतदर्शनी केस नसून, अनुकुलतेचा कल त्यांचे लाभात नाही. वादीचे लाभात तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार नाही. म्हणून, मुद्दा क्र. १ ते ३ वर नकारार्थी निष्कर्ष नोंदविण्यात येत आहे. परिणामी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **आदेश**

१) वादीचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

फलटण (एल.डी.गायकवाड)
दिनांक: ०७/०३/२०१३ दिवाणी न्यायाधिश,क.स्तर,फलटण